
# वाघोबाच्या गोष्टी


**अशोक एकनाथ घुले**

*इतर योगदान*

**विद्या अत्रेय**

## अनुक्रमणिका


प्रास्तावना .... १

अगस्ती ऋषी आणि प्रवरा .... ३

कामानिमित्त फिरताना भेटलेली माणसं .... ८

पाच पायांचा वाघ .... ११

चला काढूया वाघाचे फोटो .... १४

परसातला वाघ .... १७

इतर प्राणी .... ३४

जाताजाता .... ३६



The Rufford Small Grants Foundation
www.ruffordsmallgrants.org

The Research Council of Norway

NINA Norwegian Institute for Nature Research

Wildlife Conservation Society




# प्रस्तावना

बिबट्यांच्या अभ्यासाच्या या कामातून मला खूपच शिकता आलं. आपल्या आजूबाजूच्या विश्वाची रहस्य जाणून घेण्याची माणसाची धडपड किती क्षीण आहे हे ही जाणवलं. प्रयत्नांती आपण थोडफार काही गाठीशी बांधतो. जास्त शहाणी माणसं थोडं जास्त ज्ञान मिळवितात पण तरी या विश्वातल्या ज्ञानाच्या साठ्यातले जेमतेम मूठभर सुद्धा हाती लागत नाही आणि मग जाणवतं ते ज्ञानाचं महत्त्व ज्ञान कदाचित जगातली सगळ्यात ताकदवान गोष्ट या कामातून गवसलेली ही फार मोलाची जाणीव.

मी हे काम जुन्नर भागात उद्भवलेल्या बिबट्यांच्या समस्येनंतर सुरु केलं. २००१ आणि २००२ मध्ये मिळून त्या भागात जवळ जवळ ५० माणसांवर बिबट्यांनी हल्ले केले होते. विशेष म्हणजे ही जनावर या भागात पूर्वीपासून रहात होती आणि कधीही कुणावर हल्ला करीत नव्हती. आमच्या असं लक्षात आलं की बिबटे गाव शिवाराच्या हद्दीतच रहातात ही बाब कुणालाच ठाऊक नव्हती. अगदी वरिष्ठ वनअधिकाऱ्यांपासून ते अभ्यासकांपर्यंत आणि पत्रकारांपासून ते शासन व्यवस्थेपर्यंत कुणाचाच बिबटे गाव शिवारात रहातात यावर विश्वास बसत नव्हता. त्यामुळे गावाजवळच्या या बिबट्यांना पिंजरे लाऊन पकडलं गेले आणि जवळच्या पश्चिम घाटातल्या जंगलात सोडलं गेलं. याच पर्यवसन बिबिट्यांना सोडलेल्या परिसरातील माणसांवर प्राणघातक हल्ले होण्यात झाले.

याचवेळी आम्ही पकडलेल्या बिबट्यांना मायक्रोचिप (microchip) बसवायला सुरवात केली. जेणेकरुन जंगलात मोकळं सोडल्यावरच्या त्यांच्या वर्तणुकीचा मागोवा घेता यावा. नेमकं तेव्हाच माझ्या असं लक्षात आलं की, उसाच्या मळ्यातून या बिबट्यांना पकडलं जाण्यामागे कारण एवढच आहे की ते गावकऱ्यांना दिसले किंवा त्यांच्या शेळ्या मेंढ्यांवर हल्ला केला. माणसांवर हल्ला केल्यामुळे पकडलं जाण्याचं एकही उदाहरण नव्हते. एक अभ्यासक म्हणून यानं माझी उत्सुकता वाढली. खरोखरच बिबटे शेता-शिवारात रहातात का? आणि रहात असलेच तर त्यांच्यामुळे नेमकी काय समस्या निर्माण होते? दोन्ही प्रश्नांची उकल करणं मला मजेशीर काम वाटलं.

मग, मी खेड्यांमध्ये कामाला सुरवात केली. तेव्हा गावकऱ्यांशी बोलताना असं लक्षात आलं की, वन्यप्राणी गावाच्या आसऱ्यानं रहातात ही बाब त्यांच्यासाठी नवीन नाही. त्यांना माहितीच होतं ते. त्यांनी अनेकवेळा या वन्यजीवांना आजूबाजूला वावरताना पाहिलं होतं, त्यांच्या अस्तित्वाच्या खुणा ही अनेकदा दिसल्या होत्या. म्हणजे फक्त आमच्या सारख्या शहरीमाणसांनाच या गोष्टीच आश्चर्य वाटत होतं. वन्यप्राणी जंगलात अथवा

अभयारण्यात रहातात असं पुस्तकी शिक्षण घेतलं होतं ना आम्ही! जेव्हा बिबट्याच्या निवासस्थानबद्दलची ही वस्तुस्थिती समोर आली. तेव्हा मलाही आश्चर्य वाटलं होतं आणि अजूनही माझे काही सहकारी या माझ्या सांगण्यावर चटकन विश्वास ठेवू शकत नाहीत.

मला वाटतं ही खास भारतातच दिसून येणारी परिस्थिती आहे. चार वर्षांपूर्वी मी स्वीडनला गेले होते तेव्हा मला हे प्रकर्षानं जाणवलं. स्वीडन हा अत्यंत समृद्ध जंगलांचा देश एकूण भूभागापैकी ८० टक्के जंगल आणि लोकसंख्येची घनताही अत्यंत कमी. वर्ग किलोमीटर मध्ये जेमतेम २० माणसं एवढ्या सगळ्या जंगलांमधले वन्य मासांहारी पशु मात्र  या मंडळींनी शंभर वर्षांपूर्वीच मारुन टाकले. कालांतराने मग या वन्य पशुंच्या प्रजाती शेजारच्या देशांमधून यांच्याकडे येऊ लागल्या पण या पाहुण्यांबरोबरच सहजीवन स्थानिक लोक विसरून गेले आहेत. त्यांना लांडगे, अस्वलं आणि रानमांजरांना मारून टाकाव वाटतय कारण या वन्यप्राण्यांमुळे त्यांच्या शेळ्यांच्या आणि हरणांच्या कळपाची हानी होते. हरणं वन्यजीवांनी खाल्ली तर माणसांना शिकारीसाठी कमी पडतील अशीही त्यांना भिती वाटते. वन्यजीवन नष्ट झाल्यानं फार पूर्वीच त्यांनी शेळ्यांच संरक्षण करणं सोडून दिलं होतं त्यामुळे आता त्यांना ती कला अवगत नाही आणि मग मोकळ्यावर फिरणाऱ्या शेळ्या मढ्यांच्या कळपांवर या नव्यानं आलेल्या मांसाहारी प्राण्यांनी हल्ला केला की यांना राग येतो. इकडे आपल्याकडे मात्र इतकी सगळी माणसं आणि इतके विविध वन्यजीव निर्धोक जगत आहेत. आपल्या घराजवळ बिबट्या किंवा तरसांना विनातक्रार जगू देणारी इथली काही माणसं पाहिली की भ्रमीत व्हायला होतं.

पण जेव्हा एखाद्या माणसावर अथवा लहान मुलावर हल्ला होतो. तेव्हा मात्र टोकाची परिस्थिती निर्माण होते. माणसांनीच अशा हल्यांना सर्वप्रथम पायबंद घातला पाहिजे यात शंका नाही. हे माणसांच्याच हातात आहे. कारण सहसा वन्यप्राणी हे माणसांना टाळतात. चाहूल लागताच दूर पळून जाण्याकडेच त्यांचा कल असतो. आपण हल्ल्यामागची कारणं जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जुन्नरचंच उदाहरण घ्यायचं झालं तर असं वाटतं की विनात्रास रहात असलेल्या बिबट्यांना जणू त्यांच्या घरातून उचलून अनोळखी प्रदेशात सोडल्यानं त्यांच्यात आक्रमकता वाढीस लागली. दुसरं असं की बोलून चालून हे वन्यजीव माणसांना घाबरणारे मग पिंजऱ्यात पकडलेला बिबट्या पहायला जेव्हा गाव गोळा होतो तेव्हा ते मुकं जनावर भितीनं बिथरून जातं. कदाचित माणसाबद्दलचं त्याचं आकलनं बदलतं. माणूस त्याला शत्रू वाटू लागतो. अभ्यासाअंती मला गवसलेलं सत्य म्हणजे या वन्यजीवांना त्यांचं त्यांचं जगू देणं हाच माणसांसाठी सर्वोत्तम उपाय आहे. हा, त्यांच्या जवळपास फिरकण्यानं भिती वाढत असेल तर आपापली पाळीव जनावर सुरक्षित, बंदिस्त ठेवा. दोन चार वेळा प्रयत्न करुन हाती (दाती?) काही लागत नाही म्हटल्यावर आपसुक ही मंडळी दूर रहातील अन्नाच्या शोधात दुसरीकडे जातील. भितीपोटी घाईघाईने काहीबाही उपाय करून प्रश्न चिघळवण्यापेक्षा समंजस पणानं जगणं आणि इतरांनाही जगू देणं ही भारतीय परंपराच इथल्या विविधांगी जीवनाचा प्रवाह अखंड स्वळाळात ठेवेल यात मला तरी काही शंका नाही.

# अगस्ती ऋषी आणि प्रवरा

महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हा, त्यात अकोला तालुक्यातील सह्याद्रीच्या पर्वतमय रांगा, त्याची ओळख पश्चिम घाट म्हणून होते. याच पश्चिम घाटाला पर्यटन स्थळाचा दर्जा आहे. त्याच ठिकाणी पुरातन मंदिरे आणि मोठमोठे कोकणकड्यासारखे कडे आहेत. त्यात प्रसिद्ध हरिश्चंद्र गड, कळसूबाई, रतनगड, भंडारदरा, अमृतेश्वर अशी स्थळे प्रसिद्ध आहेत.



रतनगडजवळील अमृतेश्वर मंदिर अगस्ती ऋषींमुळे प्रसिद्ध आहे. अगस्ती ऋषींनी भरपूर तपश्चर्या केली. त्या तपश्चर्येमुळे अगस्ती ऋषींना ब्रह्मदेव प्रसन्न झाले या दंडकारण्यात एक नदी उत्पन्न करावी अशी त्यांनी ब्रह्मदेवाला विनंती केली.  ब्रह्मदेवाने ते मान्य केले आणि ते नाहीसे झाले. थोड्याच वेळात आकाशगंगेचा एक अंश मूर्तीरूपाने प्रकट झाला.

ती जीवनसरिता म्हणाली, ''भगवान मी पृथ्वीवर प्रवाहित होण्यासाठी आले आहे. तरी मला प्रवाहित होण्यासाठी असा मार्ग तुम्ही दाखवा की मला जाताना कुणाचाही अडथळा होणार नाही.'' अगस्ती ऋषींनी ती मूर्ती आपल्या कपाळी लावली, तिचे दर्शन घेतले आणि त्या मूर्तीला अमृतेश्वराजवळ निर्जन स्थळी ठेवले. त्याक्षणी ती अमृतवाहिनी पाझरू लागली. ती उत्तरमुख झाली. अगस्ती ऋषी पुढे आणि ती मागे असा प्रवास करीत करीत ती अकोले गावाजवळून वाहू लागली. ऋषींनी जीवनसरितेच्या प्रवाहात स्नान केले आणि तिला पूर्वेचा मार्ग दाखविला. ती पूर्वेला प्रवाहित होऊन वाहू लागली त्यामुळे ऋषींनी तिचे नामकरण करून तिचे नाव प्रवरा असे ठेवले. आजही ती प्रवरा नावाने महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. अशाप्रकारे अगस्तींनी प्रवरा नदी निर्माण केली. त्यानंतर त्यांनी दंडकारण्यात आपली पहिली वसाहत निर्माण केली. ती वसाहत म्हणजे आजच्या अकोल्यातील अगस्ती आश्रम होय.

याच आश्रमात ऋषींना भेटण्यासाठी प्रभू रामचंद्र आले होते. त्यांनी ऋषींना प्रणाम केला. त्यांनी रामाला एक रात्र येथे राहण्याची विनंती केली. ती रामाने मान्य केली. दुसऱ्या दिवशी राम अयोध्येत गेला. त्यामुळे अगस्ती आश्रम येथे रामाचे मंदिर बांधण्यात आले. दरवर्षी महाशिवरात्री या दिवशी येथे मोठी यात्रा भरते.

महाराष्ट्रातून या यात्रेला भाविक येत असतात. अगस्ती ऋषींनी विध्यं पर्वताला विनंती केली आणि विध्यं पर्वत गगनाला भिडण्यास चालला असता तो तसाच थांबला. ऋषींनी एका घोटात समुद्र गिळून टाकला. अगस्ती ऋषींनी प्रवरा नदी तयार केल्यामुळे त्या ठिकाणी भंडारदरा धरण होऊ शकले. त्यामुळे अकोला-संगमनेर तालुका सुजलाम् सुफलाम् झाला आहे.

मी पहिल्यांदा जो बिबट्या वाघ पाहिला तो साधारणपणे ८६-८७ साली. त्यावेळी वाघ बघण्याचा योग आला तो एका ठाकर समाजाच्या मुलामुळे. आम्ही सर्वजण बैलांना पाणी पाजण्यासाठी चिमण नदीच्या ओढ्यावर होतो. एका ठाकराच्या मुलाने आम्हाला उंच डोंगरावरून आवाज दिला. ''इथं ताबकड्यामध्ये काहीतरी आहे.''

मी म्हणालो, ''काय आहे बघ''

तो जवळ गेला. त्याने गुहेत डोकावून पाहिले असता त्याला आत वाघ दिसला. त्याने आवाज दिला, ''वाघ आहे.''

त्यावर आम्ही पाच-सहा जण त्या गुहेजवळ गेलो. हळूच वाघ पाहिला. वाघाची फक्त शेपटीच दिसली. वाघ सर्व अंग गोळा करून लपून बसला होता. आमच्या आवाजाने तो खूप घाबरला होता. आम्हाला त्याला बघण्याची खूप घाई झाली होती. मग आम्ही थोडे बाजूला झालो आणि तेथून खूप खडे त्या गुहेत फेकले. गुहा लहान असल्याने खडे त्याला लागत असतील. स्वत:चा जीव वाचवण्यासाठी तो बाहेर आला. तो बाहेर येताच आम्ही खूप लांब पळालो. तो हळूहळू बाहेर आला आणि दुसऱ्या जंगलाच्या बाजूने पळून गेला. आम्ही त्याचा पाठलाग करणार होतो परंतु त्याचं ते स्वरूप पाहून आम्ही घाबरलो. मला एवढंच माहीत होते की लोक त्याला जंगलाचा राजा म्हणतात, पण त्याला सरकारी संरक्षण आहे हे माहीत नव्हतं. आज मला खूप माहिती झाली आहे की वाघाला खडे मारू नये, त्यामुळे आपल्या अंगावर तो हल्ला करू शकतो. जर त्याचा पाठलाग केला तर तो हल्ला करून आपला प्राणपण घेऊ शकतो. मी जेव्हा मॅडमबरोबर काम करण्यास होकार दिला तेव्हा मला काहीही वाटलं नाही.पण मी जेव्हा घरी आलो तेव्हा मी माझ्या मनाला सतत प्रश्न करीत होतो. मला बिबट्याबद्दल, त्याच्या जीवनशैलीबद्दल काही माहीत नाही तर मी काय मॅडमबरोबर काम करणार? दुसरे असं की साहेब स्वत: म्हणाले होते की काही अडचण आली तर मी आहे, काही काळजी करू नको. पुन्हा मला धीर येत होता. महत्त्वाचं होतं की असलं काम मी केलेलंच नव्हतं आणि ते सुद्धा एका बाईंबरोबर.



मला तशी एक महिन्यात सवय होऊ लागली. पण यायला लागलं म्हणून मला ते काम करू वाटू लागलं. मला त्याची चांगली आवड निर्माण झाली. मला सुरूवातीला वाघाची विष्ठा ओळखता येऊ लागली. मला त्याची खात्री पटू

लागली आणि आज मी अचूक सांगेन की एखादी विष्ठा वाघाची आहे की नाही. मला कॅमेरा ट्रॅपींगमुळे हे माहीत झालं की बिबट्याची फिरण्याची वेळ कधी असते. याच्या अगोदर बिबट्या शिकारीला येतो आणि जातो एवढंच माहीत होतं.महत्त्वाच म्हणजे मला हेही माहीत झालं की बिबट्याने केलेली शिकार कशी केली, उरलेली कशी ठेवली असेल.

माझा तिसरा अतिशय महत्वाचा अनुभव हा कॉलरबद्दलचा आहे.

मला नेहमी वाटायचं की बिबट्या शिकार करतो, खातो, निघून जातो. दुसरं म्हणजे जर बिबट्याने एखाद्या वासरावर, शेळी किंवा कुत्र्यावर हल्ला करून त्याला जखमी केलं आणि त्याला खाण्याच्या वेळी जर काही अडथळा आला (उदाहरणार्थ, पाळीव प्राण्यावर हल्ला करताना त्या प्राण्याच्या मालकाला जाग आली) तर, वाघ ते भक्ष्य टाकून निघून जातो. किंवा पुन्हा येतो एवढंच. परंतु वाघ त्याच रात्री तर येतोच पण दुसऱ्याही दिवशीही तो त्या भक्ष्याला शोधण्यास येतो. जर मारलेला प्राणी लोकांनी न पुरता ओढ्याला किंवा शेतात टाकल्यास बिबट्याला तो खायला मिळतो आणि तसं झालं तर तो दुसऱ्या प्राण्याला मारीत नाही. जर बिबट्या फिरत असताना त्याला मेलेला प्राणी आढळला उदाहरणार्थ, वासरू किंवा शेळी, तर जोपर्यंत तो प्राणी ताजा आहे, त्याला वास येत नाही, तोपर्यंत बिबट्या तो खातो. धुमाळवाडीला एक शेळी पिल्लांना जन्म देताना मेली. त्या माणसाने ती ओढ्यात टाकली. ती मी धुमाळवाडीतून जाताना रस्त्याच्या बाजूला पाहिली. मी म्हणालो आज वाघांना भरपूर खायला मिळणार आणि तसंच झालं. दोन वाघांनी ती शेळी पूर्ण खाऊन टाकली त्यामुळे मी लोकांना सांगतो जर बिबट्याने शेळी मारली आणि त्याला ती खायला मिळाली नाही तर तो दुसरी मारणार. म्हणून मृत झालेली शेळी गाडू  नका. त्यामुळे त्याला दुसऱ्या दिवशी खायला मिळेल आणि दुसरा प्राणी वाचेल.

मला अजूनही गोष्टी उमजायला लागल्या. जर आपण एखादा बिबट्या पकडला आणि १००-१५० किलोमीटर अंतरावर जरी सोडला तरी तो पुन्हा ज्या ठिकाणी पकडला त्या ठिकाणी येतो. त्यामुळे बिबट्याला पकडणे आणि सोडून देणे हा काही उपाय नाही. सारखे बिबटे पकडणे आणि सोडून देणे यामुळे बिबट्या चिडचिडा आणि रागीट होतो. त्याला ज्या ठिकाणी सोडले तो परिसर त्याच्या परिचयाचा नसतो म्हणून तो कोणावरही हल्ला करू शकतो.



जर आपले पशुधन वाचवायचे असेल तर पाळीव प्राण्यांचे बंदिस्त गोठे बांधा. त्यामुळे बिबट्याला शिकार मिळणार नाही. बिबट्याला खायला कमी पडल्यास उत्पत्ती कमी होते. उदाहरणार्थ, जर खायला भरपूर असेल तर आई पिलांना जन्म देते आणि त्यांचं संगोपन चांगलं करते. त्यामुळं बिबट्याची संख्या वाढते. जर खायला कमी झालं तर नैसर्गिकरित्या बिबट्याची उत्पत्ती कमी होईल, असं मला वाटते. म्हणून कुत्रे, शेळी, वासरे, कोंबड्या यांना रात्री बंदिस्त ठेवा. त्यामुळे

शेतकऱ्याचे नुकसान होणार नाही. रात्री सहा–सात वाजल्यापासून लहान मुलांना घराबाहेर फिरू देऊ नये. रात्री अंगणात झोपणे टाळावे. रात्री फिरताना हातात काठी बाळगावी व चालताना आवाज करावा. त्यामुळे जर बिबट जवळ असेल तर त्याला माणसाची चाहूल लागताच तो घाबरून निघून जाईल व धोका होणार नाही, असं मला खात्रीशीर वाटते.



*बस स्टँडवरही वाघ येतो ह्याला कारण तेथे मिळणारी कुत्री आणि डुकरं!*

# असतील डुकरे तेथे जमतील वाघ



# कामानिमित्त फिरताना भेटलेली माणसं

**वाघावर काम करायचे म्हणजे वाघाच्या मागे मागेच जाव लागत. असेच फिरता फिरता खूप लोक भेटतात. नुसत भेटत नाही तर प्रश्नही विचारतात, अशाच भेटींवर आधारित हा भाग आहे.**

## मेहेदुरी दत्तमळा बंगाळवस्ती

उन्हाळ्याचे दिवस होते. आमचं विष्ठा शोधण्याचं काम चालू होते. आम्ही मेहेदुरी फाट्याला उतरलो आणि बहिरवाडीच्या पूर्वेला बंगाळवस्तीतून जात होतो. आम्ही तिघेजण होतो आमच्या पाठीवर मोठ्या बॅगा होत्या. एका घराजवळ जेव्हा आम्ही गेलो तेव्हा एक मुलगी बाहेर आली. आमच्या पाठीवर बॅग पाहील्यावर तिला वाटलं ही माणसं साडी विकण्यास आलो असावीत.

ती लगबगीने पुढे आली. म्हणाली, ''काका, क्या है? साडी है क्या?'' मी उभा राहिलो आणि म्हणालो, ''नही नही साडी नही है''

''तो क्या है?'' मी म्हणालो, ''कुछ नही है'' आम्ही तसेच पुढे गेलो. पुढे गेल्यावर एक आजोबा भेटले.

आजोबा म्हणाले, ''काय, कोठून आले?'' आम्ही म्हणालो, ''अकोलेवरुन'', ''कशासाठी?''

''आम्ही वाघाची विष्ठा शोधत आहोत.'' त्यावर तो म्हणाला, ''वाघ काय गावात नसतो, तो रानात असतो...ह्या विष्ठेचे तुम्ही काय करता?'' मी म्हणालो, ''ती आम्ही तपासणीसाठी पाठवतो. त्यामुळे वाघाने कोणता प्राणी मारला, काय खाल्ले याची माहिती मिळते आणि वाघाची संख्याही कळते.''

## शेरणखेळ ते पिंपळगाव



एप्रिल महिना होता. आम्ही तिघेजण (अभिजित, अविनाश) पिंपळगाव जंगलात बिबट्याची विष्ठा शोधण्यास गेलो. सुरुवात करताना आम्ही शेरणखेळपासून केली. शेरणखेळ संपल्यावर पिंपळगावची हद्द सुरू झाली. आम्ही सोंगाळवाडीजवळील जंगलात होतो. आमच्या पाठीवर पिशव्या होत्या. सोंगळवाडीतील दहापंधरा बाईमाणसांनी आम्हाला पाहिल्यावर मोठमोठ्याने ओरडण्यास सुरुवात केली. ''चोर, चोर,चोर. धावा, धावा.''

आम्हाला वाटले आमच्या मागे कोणी आहे. तर आमच्या मागे कोणी नव्हते. आम्ही त्यांना सांगितले ''आम्ही चोरबीर काही नाही. आम्ही वाघ कोठे राहतो, त्याची विष्ठा शोधत आहोत.'' एवढे सांगूनही त्या बाई गप्प राहिनात. मग आम्ही त्यांचा विचार सोडून दिला आणि आढळवाडीत गेलो. आमची गाडी तिथे लावली होती. ती घेतली आणि सरळ अकोलेला आलो.

मागे त्या बाईमाणसांनी सगळ्या वाडीत आरडाओरडा करून सांगितले की तीन चोर आले आहेत. ते जंगलात फिरतात आणि एका तासापूर्वी ते सहाकोशे डोंगराला गेले. असे सांगितल्यावर गावातील तरुण मुले जमा झाली आणि जंगलाच्या दिशेने गाड्यांवर जाऊ लागली. ज्यावेळी आम्ही मोटरसायकलवरून जात होतो त्यावेळी आम्हाला ती माणसे भेटली होती. त्यांनी आम्हाला काहीच विचारले नाही. ते रात्र होईपर्यंत जंगलात फिरत होते. त्यांना काहीच मिळाले नाही.

जेव्हा आम्ही दुसऱ्या दिवशी आढळवाडीत गेलो, तेव्हा रस्त्यात भात मळणारा आम्हाला म्हणाला, ‘‘पाहुणे, तुम्ही कोठून आले?’’ तेव्हा आम्ही सांगितलं, ‘‘अकोलेवरून’’. ‘‘कशासाठी आले?’’ तेव्हा आम्ही सांगितलं, ‘‘आम्ही वाघाची विष्ठा शोधत आहोत.’’ तेव्हा तो म्हणाला, ‘‘जंगलात फिरताना जरा जपून फिरा. काल सायंकाळी तीन चोर आले होते. त्यांच्या पाठीवर पिशव्या होत्या. आणि ते सहाकोशाला गेले आहेत. रात्री गावातील भरपूर माणसे बॅटरी लावून बघत होती. त्यांना काहीच सापडले नाही.’’ तेव्हा त्याला मी म्हणालो, ‘‘ते चोर दुसरे कोणी नसून आम्हीच तिघे होतो.’’

जी माणसे रात्री बॅटरी लावून बघत होती, त्यांनी ही बातमी बाभळवंडीला सांगितली. काल तीन चोर जंगलात घुसले आहेत. त्याही गावातील लोक जंगलात जायला घाबरलेले होते. त्यामुळे जंगलात कोणीच नव्हते.

आम्ही तिसऱ्या दिवशी बाभळवंडीला गेलो. जाताना आम्ही मोटरसायकलवरून गेलो. आम्हाला गावातील पत्ते खेळणाऱ्यांनी पाहिले. त्यांना कोठलाही संशय आला नाही. आम्ही जेव्हा उंच डोंगरावर गेलो तेव्हा काही लोकांनी आम्हाला पाहिले. त्यांना कालची खूण पटली. तीन चोर. पाठीवर पिशव्या. गावातील वीसपंचवीस लोकांचा घोळका आमच्या दिशेने आला. ते बऱ्याच अंतरावरून आरोळ्या देऊ लागले.

‘‘अरे तुम्ही कोण आहात? आणि काय करता जंगलात? खाली या.’’ असे म्हटल्यावर मी म्हणालो, ‘‘तुम्हीच वर या.’’

ते काही वर येईनात. आम्ही खाली उतरेना. त्यांचे आमचे अंतर अंदाजे पाचशे फूट होते. थोड्या वेळाने गावाकडून जास्त माणसे येऊ लागली. मग आम्ही खाली आलो. तर काय आश्चर्य! त्या माणसांजवळ कोयते, काठ्या, कुऱ्हाडी होत्या. ते आम्ही चोर आहोत असं समजून मारण्यास आले होते. मग आमची ओळख पटली की आम्ही चोर नाही.

मग पाच वाजता आम्ही पुन्हा पिंपळगावला आलो. चहाच्या दुकानात गेलो. तिथे मित्रही भेटला. त्याने आम्हाला चहा पाजला. तेवढ्यात माझ्या दुसऱ्या एका मित्राच्या मुलाचा मला फोन आला.

‘‘मामा काय, तुम्ही कोठे आहात?’’ तर मी म्हणालो, ‘‘तुमच्या गावात.’’ ‘‘काय करता?’’ तर मी म्हणालो, ‘‘चहा पितो.’’ तर तो म्हणाला, ‘‘तुम्ही ठीक आहात ना?’’ मी म्हणालो, ‘‘हो. तू असं का म्हणालास?’’ तर तो म्हणाला, ‘‘मला बाभळवंडीवरून फोन आला. तीन चोर सापडले. त्यातील एक खतम. एक जायच्या बेतावर.’’ तेव्हा मी त्याला सांगितले, ‘‘आम्ही तिघेही ठीक आहोत, काही काळजी करू नकोस.’’

## हेच तीन (विष्ठा) चोर!



# पाच पायांचा वाघ

सकाळी ८ वाजले होते. मी नेहमीप्रमाणे कामाला जायला निघालो. तेवढ्यात मॅडमचा फोन आला. रेडेला ऊसात वाघ मरून पडला आहे. मी लगेच अकोलेला गेलो आणि किरण व मॅडमबरोबर रेडेला गेलो.

आम्ही बिबट्याजवळ गेलो. बिबट्याचा खूप वास येत होता. त्याला किडे पडले होते. त्याची ती दुर्गंधी जवळ उभे राहू देत नव्हती. गोंदके साहेबांनी मृत बिबट्याचा पंचनामा केला. मी जवळच उभा होतो. मला पुन्हा पुन्हा शंका येत होती, हा वाघ कशाने मेला असेल? म्हणून मी एकटाच ऊसाच्या शेतात फिरत राहिलो. खूप फिरुन पाहिलं. काहीही सापडत नव्हतं. मग मी पुन्हा वाघाजवळ आलो. वाघाला पुन्हा पाहू लागलो. याला कोणी मारलेले तर नाही ना? आणि मी पुन्हा आजुबाजूला फिरण्यास सुरूवात केली.

जवळ असलेल्या ऊसात काहीतरी फिरल्याच्या खुणा दिसल्या. तसाच मी पुढे गेलो. आणि काय आश्चर्य! माझ्यासमोर वाघाचा पाय पडलेला. मला वाटले मृत वाघाचा पाय असावा. म्हणुन मी गोंदके साहेबांना म्हणालो, ''वाघाला किती पाय आहेत?'' त्यावर ते बोलले, ''वाघाला किती पाय असतात?'' मी म्हणालो, ''वाघाला चारही पाय आहेत का?'' ते म्हणाले, ''हो, आहेत''

तर मी वाघाचा पाय हातात घेतला. वर करुन दाखवला. वाघाला जर चार पाय आहेत, तर हा पाचवा पाय कुठून आला!

सगळ्यांना आश्चर्याचा धक्का बसला आणि सर्वजण माझ्याकडे पाहु लागले. मी पाय घेऊन त्यांच्याकडे गेलो. सगळे पाय पाहील्यावर म्हणाले दुसराही वाघ येथेच असेल किंवा मेलेला तरी असेल. मग आम्ही सगळ्यांनी शोधलं. वाघ सापडला नाही.

दुसऱ्या दिवशी मॅडम आणि किरण गेले. त्यांनी त्या मेलेल्या बिबट्याला शोधून काढले. माझ्या मते दोन्ही वाघांना एखाद्या मोठ्या नरानं मारलं असेल.

*विद्या आत्रेय यांची पुष्टी* – आम्हाला मृत बिबट्याजवळ विष्ठा आणि इतर अवशेष मिळाले. पुढच्याच दिवशी मी तीन पायांच्या बिबट्याच्या शोधात एका वेगळ्या दिशेने निघाले. आम्ही जेव्हा जवळ पोहोचलो तेव्हा आम्हाला ती नेमकी जागा सापडेना. त्यामुळे आम्ही आजूबाजूच्या सर्व बांधांवर फिरून आदल्या दिवशी जिथे मृत बिबट सापडला होतो ते शेत शोधू लागलो. तेव्हाच अचानक आम्हाला समोरच्या वाटेवर पूर्णपणे खाऊन टाकलेला नर बिबट सापडला. त्याचे डोके शेपटीला फक्त मणक्याच्या हाडांच्या आधारानेच जोडलेले होते. बाकीचे पूर्ण शरीर खाल्ले गेले होते. मार्जार कुळातील प्राणी आपल्या इलाख्याची निशाणी म्हणून नखांनी खुणा करून ठेवतात.



आम्हाला त्या जागेच्या सर्व बाजूंना अश्या खुणा सापडल्या. वनविभाग कर्मचारी आल्यानंतर आम्ही त्या वाटेवर अजून पुढे गेलो. आम्हाला एका नखांनी उकरलेल्या ठिकाणी मोठी विष्ठा सापडली. त्या विष्ठेमध्ये बिबट्याचे केस होते. असं लक्षात आले की एका नर बिबट्याला (आम्हाला माहीत होते की ते मोठे जनावर होते. आम्ही त्याला ''रेडे नर'' असे नाव दिले होते.) आपल्या क्षेत्रात इतर प्राण्यांनी केलेली घुसखोरी त्याला आवडली नव्हती. भारतात इतर प्रदेशांमध्येही बिबट्यांनी आपल्याच जातीच्या प्राण्यांना मारून खाऊन टाकण्याच्या नोंदी आहेत. वयाने मोठे निवासी प्राणी आपल्या क्षेत्रात येणाऱ्या छोट्या प्राण्यांना परतवून लावतात व मारूनही टाकतात हे ज्ञात आहेच. इथेही हेच घडले असावे. खरे म्हणजे स्वत:ची जनसंख्या नियंत्रणात ठेवण्याची ही बिबट्यांसारख्या प्राण्यांची पद्धत आहे. अगदी लहान वयाची शावके बऱ्याचदा आजारांनीच मरतात. एकूण चारच्या आसपास जन्मास येणाऱ्या शावकांपैकी फक्त एक-दोन शावकांचीच पूर्णपणे वाढ होते. एकदा पूर्ण वाढ झाल्यानंतर त्यांना स्वत:चे असे इलाखे शोधावे लागतात जिथे ते सुरक्षित राहू शकतील. परंतु रिकामे इलाखे शोधताना सर्वात गंभीर धोका हा इतर प्रौढ प्राण्यांपासून असतो. ते घुसखोरी सहन करत नाहीत. आपण माणसांना जसे कोणीतरी परके येऊन आपल्या घरात राहिलेले आवडणार नाही, तसेच काहीसे यांचे असते.

### विष्ठा गोळा करणे

एकदा आम्ही विष्ठा गोळा करत असताना सावरगाव चाट येथे भाल दरीत गेलो होतो. जंगलात गवत कापणारे लोक आमच्याकडे बघून त्यांच्या-त्यांच्यात बातचीत करत होते ते ऐकून आम्हाला हसू येत होते. ते म्हणत होते, ''हे लोक मोबाईल टावरचा सर्वे करत आहेत. येथे मोबाईल रेंज नाही म्हणून.'' आम्ही जेव्हा जवळ आलो तेव्हा एका बाईने आम्हाला विचारलं, ''काय, कोठून आले?''

आम्ही म्हणालो ''अकोलेवरून.'' तर ती म्हणाली, ''मोबाईल टावरचा सर्वे चालू आहे काय?'' तर आम्ही म्हणालो ''हो.''

कारण आम्हाला त्या लोकांच्या प्रश्नांना उत्तरे द्यायचा कंटाळा आला होता. जरी हे काम किचकट असले तरी ही ते बिबट्याचा आहार जाणून घेण्याच्या दृष्टीने फार महत्वाचे असते. आम्ही आधी विष्ठा पाण्याच्या प्रवाहाखाली धुवून काढतो. उरलेले अवशेष सुकवतो, हाडे आणि नखांचे तुकडे चाळून काढतो आणि मग केस सूक्ष्मदर्शकाखाली बघून प्राणी ओळखला जातो. ऊसाच्या शेतातले बिबटे मुख्यत: कुत्र्यांना खातात. शेतांच्या जवळ राहणाऱ्या बिबट्यांच्या आहाराचा सगळ्यात जास्त भाग हे पाळीव प्राणीच असतात. आम्हाला बिबट्याच्या विष्ठेमध्ये मांजरीची नखेही मिळाली आहेत. जंगली प्राण्यांमध्ये फक्त मुंगूस आणि उदमांजरेच मिळाली.

तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे विष्ठेतून प्रत्येक बिबट्याचा वेगळेपणा ओळखता येतो, त्यांचे लिंग समजू शकते, तसेच त्यांच्या संख्येबाबतही निदान करता येते. बिबट्याची गुणसूत्रे त्याच्या आतड्याच्या पेशींमधून घेता येतात. पितृत्व किंवा गुन्हेगार ओळखण्यास जी पद्धत वापरतात तीच पद्धत विशिष्ठ बिबट्या ओळखण्यासाठी वापरली जाते.

विष्ठेतून मिळणाऱ्या गुणसूत्रांमुळे प्राण्यांमधील नातीही समजू शकतात. ह्या विष्ठेशी संबधित कामातून आम्हाला हे सुद्धा समजले की माळावर राहणाऱ्या बिबट्यांपेक्षा मानववस्तीजवळ राहणाऱ्या बिबट्यांची संख्या खूप जास्त आहे. बहुधा त्यांचे आवडते खाद्य असणारी शेकडो कुत्री आणि डुकरे हे याचे कारण मानता येईल.

## जेवणासाठी धडपड




# चला काढूया वाघांचे फोटो

कॅमेरा लावण्याचे काम चालू होते. रात्रीची वेळ होती. मी आणि माझा मित्र आम्ही दोघेच अंधारात. रात्री ९ वाजण्याची वेळ असेल. मी मित्राला गाडीची लाईट कॅमेऱ्यावर धरण्यास सांगितली. कॅमेरा उघडीत असताना गाडी बंद पडली. सगळीकडे काळाकुट्ट अंधार होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भरपूर ऊस होता आणि त्यातच बिबट वाघाचे येण-जाणे असायचे. गाडी बंद झाल्यावर मी माझ्याकडील हेड टॉर्च चालू केला. आजूबाजूला ऊस, ऊसात पाणी. शेजारीच ओढा. ओढ्यावर किटीवेअर बांधलेलं. त्यात खूप पाणी साठलेलं.

रात्रीच्या अंधारात रातकिडे किर-किर करत होते. काजवे चमकत होते. एक कॅमेरा सुरु केला आणि दुसरा चालू करण्यास सुरुवात केली. हेड लाईट कमी झाली होती.

तितक्यात पाठीवर थाप बसल्यासारखे झाले! मी हालचाल बंद केली. मला असे वाटले की पाठीमागून बिबट्याने पंजा मारला. जास्त हालचाल केली तर बिबट्या चावा घेईल. परंतु बिबट्या असा एकाच ठिकाणी कसा पंजा दाबून धरील? आणि मी घाबरलेल्या अवस्थेत उभा राहिलो. आणि काय आश्चर्य! तो बिबट्या वाघ नसून एक छोटा वटवाघुळ होतं. ते भक्षाच्या शोधात माझ्या अंगावर आदळलं होतं.

**रूंभोडी बाभळी –** *विद्या आत्रेय यांचे निवेदन*




*हा ॲटोमॅटीक फोटो काढणारा 'कॅमेरा ट्रप'*

एके दिवशी घुले आणि मी रूंभोडीला काही कामानिमित्त गेलो होतो. तेथील लोकांना जेव्हा कळले की आम्ही बिबट्यांसंबंधी काम करायला आलो आहोत तेव्हा नेहमीप्रमाणे त्यांनी अनुभवलेली घटना सांगण्यास सुरूवात केली. त्यांच्या घराजवळ बाभळीचे एक सुंदर झाड होते. त्याची एक जाड फांदी त्यांच्या घराच्या छपरावर वळलेली होती. त्याच घरातील एका बाईंनी सांगितले की सकाळी सहाच्या सुमाराच्या अंगण झाडत असताना त्यांच्या छोट्या मुलाने सांगितले की झाडावर एक मांजर आहे. ते मांजर म्हणजे एक बिबट्या होता. तो त्या आडव्या फांदीवर बसला होता. त्या बिबट्याने पाहिले की लोक आपल्याकडे पाहत आहेत तेव्हा तो झाडावरून उतरून पळून गेला. त्या बाई म्हणाल्या की त्यांच्या घराजवळ नेहमीच बिबट्यांचा वावर असतो.

बऱ्याच महिन्यांतर कॅमेऱ्याच्या जाळ्यासाठी जागा शोधण्यापूर्वी आम्हाला वाटले की ते बाभळीचे झाड कॅमेरा लावण्यासाठी चांगली जागा असू शकते. मग आम्ही त्या भागात



निघालो. पण आम्हाला त्या घराजवळ पोहोचताच आश्चर्याचा धक्का बसला बाभळीचे झाड तिथे नव्हतेच! आम्ही घरातील लोकांना त्याबाबत विचारले तेव्हा ते म्हणाले की त्यांनी ते झाड कापून टाकले कारण पुन्हा एकदा त्यावर बिबट बसलेला दिसला.

## कॅमेरा ट्रॅप

बिबट्यासारखे वन्यप्राणी अतिशय मुक्तपणे रहाणारे असतात. त्यांच्याबाबत माहिती मिळवण्यासाठी काही पद्धती वापरल्या जातात. अश्याच एका पद्धतीमध्ये ''कॅमेरा ट्रॅप''चा उपयोग होतो. हे सामान्य कॅमेरे असतात ज्यांना उष्णता संवेदक यंत्राशी जोडलेले असते. जेव्हा एखादा गरम रक्ताचा प्राणी (किंवा एखादी मोटारसायकलही!) या उष्णता संवेदक यंत्राच्या समोरून जातो तेव्हा हे यंत्र कॅमेऱ्याला चालू करते आणि आपल्याला प्राण्याचे छायाचित्र मिळते.

ही पद्धत आम्ही बिबट्यांची संख्या मोजण्यासाठी वापरली कारण त्यांच्या शरीरावरील ठिपके प्रत्येक प्राण्यासाठी वेगळे असतात. आम्हाला कॅमेऱ्याच्या सापळ्याच्या या पद्धतीमुळे बिबट्याबद्दल खोलवरची माहिती मिळाली. उदाहरणार्थ, आम्हाला हे समजले की अनेक बिबटे रात्री एकच रस्ता वापरतात. आम्हाला हेही कळले की ते बरेच अंतर पार करतात. म्हणून जर तीन लोक म्हणत असतील की तीन बिबटे आहेत तर त्याचा

# परसातला वाघ



अर्थ असाही होऊ शकतो की एकच बिबट्या तीन वेगवेगळ्या ठिकाणी होता. एक असा बिबट्या होता, त्याचे छायाचित्र नदीजवळच्या आमच्या कॅमेऱ्याच्या सापळ्यात आले आणि दहा किलोमीटर दूर एका डोंगऱ्याच्या पायथ्याशीसुद्धा आले. आम्हाला हे सुद्धा कळले की माळावर राहणारे बिबट वस्तीच्या आजूबाजूला राहणारया बिबट्यांपेक्षा जास्त अंतरे फिरतात. वस्तीच्या आजूबाजूला राहणारे बिबट तिथे मिळणाऱ्या शेकडो डुकरे आणि कुत्री यांच्या जवळ असतात.

स्थानिक लोकांनी आमच्या कॅमेऱ्याच्या सापळ्याचे इतर उपयोगही शोधले. एक दिवस आम्ही कॅमेरा चालू करायला गेलो असताना एक शेतकरी धावतच आमच्याकडे आला आणि छायाचित्रे मागू लागला. कारण, त्याची खात्री होती की चोर आमच्या कॅमेऱ्यामध्ये आले असणार. आम्ही अर्थातच त्याची मागणी मान्य केली.

## परसातला वाघ

**ह्या भागात आपण माणूस आणि वाघ ह्याच्या जेव्हा भेटतात तेव्हा काय काय होऊ शकते हे बघणार आहोत काही घटना दु:खद आहेत तर काही तितक्याच मजेशीर घटनांच्या मध्ये मध्ये आम्ही लिहिण्याचा प्रयत्न केला आहे जेणे करून आपल्या एवढे नक्की जाणवेल की अशी एखादी घटना आपल्या परसात घडली तर काय खबरदारी घेता येईल.**

### गर्दणी २

गर्दणी गावातील मडके यांच्या विहिरीत बिबट्या पडल्याची बातमी आम्हाला समजताच आम्ही त्याच्या घरी पोहोचलो. त्यांनी आम्हाला विहीर दाखवली. विहिरीत बिबट्या वाघाचे साधारण नऊ-दहा महिन्याचे पिल्लू पडलेले होते. विहिरीत एक कोंबडीही पडलेली होती. कोंबडी पाण्यात मेलेली होती आणि वाघाचे पिल्लू वर बाजूला येऊन कपारीत बसलेले होते.

मी विहीर-मालकाला विचारले, ''हे पिल्लू विहिरीत कसं काय पडलं?''

तर तो सांगू लागला. ''रात्री एक-दोनचा टाईम असेल. आम्ही घरातील सर्व माणसं अंगणात झोपलो होतो. घराजवळ अंगणात काशिदाचे झाडावर रात्री कोंबड्या बसतात. रात्री वाघ आला आणि कोंबड्यांसाठी तो झाडावर चढला. त्याने आणि त्याच्याबरोबर असणाऱ्या पिल्लाने प्रत्येकी एक-एक कोंबडी पळवली. जेव्हा कोंबड्यांचा आवाज झाला तेव्हा वाघ कोंबड्यांना घेऊन गेला होता. आम्ही पुन्हा झोपलो. काय आहे ते सकाळी पाहू असं ठरवलं. एक तास होतो ना होतो तर वाघ पुन्हा अंगणाच्या जवळ आला आणि जोरात ओरडला. आम्ही जागे झालो तर वाघ पुन्हा-पुन्हा येऊन ओरडत होता. आम्ही नंतर घरात झोपायला गेलो. सकाळी लवकर उठलो. कोंबड्याना पाहू लागलो. त्यात तीन कोंबड्या कमी होत्या.''

नंतर तो मोटार चालू करण्यास गेला असता त्याला विहिरीत एक कोंबडी मरुन पडलेली आणि एक वाघाचे पिल्लू कपारीत बसलेले दिसले. वाघीण पुन्हा पुन्हा येण्याचे कारण तिचे एक पिल्लू चुकले आहे असे तिला वाटत होते. पिल्लू त्याच घरात अडकून राहिलं असावं असे तिला वाटलं.

### रात्रीची घटना (सांगवी)

ही घटना आहे सांगवी गावची. रात्रीचा टाईम होता. सांगवी गावातील लोक रात्री अंगणात झोपत होते. एक दिवस अशी घटना घडली... रात्री बिबट्या गावात घुसला. अंगणात खूप माणसं झोपलेली होती. बिबट्याने माणसांना काहीच केले नाही. मोठ्या माणसांच्या मधे आईजवळ मुलगी झोपलेली

होती. मुलगी शरीराने अशक्त होती. त्याच मुलीला बिबट्याने डोक्याचा चावा घेऊन तीस-चाळीस फूट ओढत नेले. तिच्या ओरडण्याच्या आवाजाने गावातील सर्व लोक, आई-वडील मुलीच्या दिशेने धावत गेले. आरडाओरड केल्यामुळे बिबट्या मुलीला तिथेच सोडून पळून गेला. मुलीला आई-वडिलांनी, गावकऱ्यांनी तातडीने दवाखाना केला. त्यामुळे मुलीचे प्राण वाचले.

त्याच रात्री बिबट्याने सांगवी गावच्या वाडीत (पिपळदरावाडी) येथे मुलावर हल्ला करुन, मुलाला घेऊन जंगलात गेला. लोकांनी खूप आरडाओरडा करुन टॉर्चच्या सहाय्याने मुलाला शोधून काढले. मूल मेलेल्या अवस्थेत होते. त्याच्या जवळ बिबट्या बसलेला होता. लोकांच्या आवाजाने त्या मुलाला तिथेच टाकून तो पळून गेला. लोकांनी मुलाला जेव्हा उचलले, तेव्हा मुलाचा एक हात खाल्लेला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी तरुण मुलांनी जंगलात फिरुन पाहीले; तर ज्या ठिकाणी मुलाला बिबट्या घेऊन गेला होता तिथे गुहा होती. त्याच गुहेत बिबट्या बसला होता. गावातील, वाडीतील, परिसरातील लोकांना घटना माहीत झाल्याने खूप लोक जमा झाले होते. त्यांनी सगळ्या बाजूंनी त्याला घेरले. बिबट्या मध्यभागी गुहेत होता. बिबट्याला मारण्यासाठी शार्पशूटर बोलवले होते. त्यांना मारण्याची परवानगी मिळाली नव्हती. शार्पशूटर येऊनसुद्धा त्याला शूट करत नाही, मग गावातील लोकांनी एकविचार करून त्याला मारायचे ठरवले. लोकांनी कुऱ्हाडी, कोयते, भाले, काठ्या घेतल्या. त्याला मारण्यासाठी गुहेजवळ जाऊन आग लावली. त्यामुळे बिबट्या बाहेर आला. लोकांनी त्याला दगडाने मारण्यास सुरुवात केली. जो त्याच्याजवळ मारीत होता त्याला बिबट्या जखमी करीत होता. काही लोकांनी त्याला कुऱ्हाडी मारल्या. त्यामुळे बिबट्या खूप चवताळला. त्याने दहाबारा माणसे जखमी केली. लोकांनी त्याला पकडण्यासाठी ससे पकडण्याची जाळी धरली होती. त्यातून बिबट्याला थोडी वाट मिळाली आणि बिबट्या पळाला. तोपर्यंत अंधार पडण्यास सरुवात झाली होती. शेवटी रात्र झाली. बिबट्या फरार झाला. लोकसुद्धा घरी परतले.

***विद्या आत्रेय यांची पुष्टी*** – ही घटना त्वरेने निर्णय न घेण्याच्या आणि पूर्व अनुभवांवर आधारित योजना अस्तित्वात असल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर प्रकाश टाकते. लोक घाबरले होते कारण लहान मुलांवर हल्ला होण्याची दोन आठवड्यांमधील ही तिसरी घटना होती. प्राणी मुलाच्या देहावर बसून राहिला होता आणि स्थानिक कर्मचाऱ्यांनी विनंती करूनही गोळ्या झाडण्याचा आदेश दिला गेला नाही. एकदा संध्याकाळ झाल्यानंतर लोकांनी सूत्रे त्यांच्या हातात घेतली कारण त्यांना माहीत होते की रात्री बिबट्या पळून जाणार आणि त्याचा परिणाम अजून एका लहान मुलाचे आयुष्य धोक्यात येण्यात होईल.

इतर जंगली प्राण्यांप्रमाणेच बिबटे माणसांना खूप घाबरतात व त्यामुळे माणसांच्या वाटेला जात नाहीत. बऱ्याचदा माणसांच्या समोर आल्यास पळून जाण्यातच त्यांचे आयुष्य जाते, ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच जेव्हा बिबट्या माणसावर हल्ला करतो तेव्हा नक्कीच त्यात काहीतरी चुकीचे असते. हे प्राणी फार दडून राहणारे असल्यामुळे ते असले हल्ले का करतात याची कारणे आपल्याला शोधणे कठीण आहे. परंतु असे दिसून येते की वयाने लहान असणारे प्राणी ज्यांची आई मेलेली आहे अशा प्राण्यांना लहान मुले ही सहज मिळणाऱ्या भक्ष्यासारखी वाटू शकतात. माणसांवर हल्ला

करणारे प्राणी मानसिकरित्या कामकुवत झालेलेही असू शकतात. बऱ्याचदा असे आढळले आहे की पकडून नंतर नव्या ठिकाणी सोडले गेलेले प्राणी त्या परिसरातील लोकांवर हल्ला करतात. हे होण्याचे कारण म्हणजे त्यांना नवीन जागेची माहिती नसते. अशावेळी ते तणावाखाली, तसेच भुकेले असतात. अशा पूर्णपणे नवख्या जागेत लहान मुले पकडण्यास सर्वात सोपी व सहजतेने सापडणारी असतात.

## कुत्राच लई टेस्टी!



### नाईकवाडीतील घटना

हिवाळ्याचे दिवस होते. नायकरवाडीहून एक माणूस मुथाळणेला पायी चालला होता. जंगलातून वाट होती.  ती वाट संपल्यावर उंचाचर कडा होता. तो तेथे चढून गेल्यावर त्याला दोन बिबट वाघाची पिल्ले दिसली. ती दोन पिल्लं खेळत होती. ज्या  ठिकाणी ती पिल्लं खेळत होती तो रस्ताच होता. पिल्लांनी त्या माणसाला पाहिलेच नाही. ती खेळण्यात दंग होती. त्या माणसाला वाटलं आपण त्या पिल्लांना घाबरवावं. म्हणून तो हातातली कठी उंच करुन ओरडला. पिल्लं घाबरली आणि त्यांनी वेगळाच आवाज काढला. त्या पिल्लांची आई गावाकडुन येणाऱ्या जाणाऱ्या शेळ्या बघत असावी. पिल्लांचा आवाज येताच ती क्षणाचा विलंब न लावता आली आणि तिने त्या माणसावर हल्ला केला. त्याला खाली पाडले. नखाने ओरबाडले. थोडा चावा घेतला. आणि पिल्लांना घेऊन निघून गेली.

### शेकईवाडी

शेकईवाडी, ता. अकोले गावातील गोष्ट. आम्ही शेकई गावाच्या उत्तरेला विलास ढेकणे यांच्या शेतात बिबट्याचे ठसे पाहत फिरत होतो. विलास ढेकणे आम्हाला म्हणाला, ‘‘आता काय वाघ बघता? रात्री वाघ बाहेर येतो. आता तो ऊसात बसून असेल.’’

मग मी त्याला म्हणालो, ‘‘तुला काय माहीत वाघ ऊसात बसून असेल ?’’

तेव्हा तो म्हणाला, ‘‘परवाच्या दिवशी मी लहान ऊसाला पाणी भरत होतो. ऊसाचं पाडगे भरलं म्हणून मी बारं द्यायला गेलो. खोरें घेतलं आणि बारं द्यायला सुरुवात केली. तर समोरून आवाज आला, म्हणून मी पाहिलं तर वाघ माझ्याकडे येत होता. मी घाबरलो आणि मागं सरकत सरकत चाललो. तर वाघ माझ्यापासून वीस पंचवीस फूट अंतरावरून हळूहळू चालत माझ्याकडं बघत ऊसात निघून गेला. त्यामुळे तो याच ऊसात असेल.’’ असं तो सांगत होता. मग मी त्याला विचारलं ‘‘वाघ कसा होता?’’ तर तो म्हणे ‘‘पट्ट्याचा होता.’’

मग मी त्याला म्हणालो की ‘‘ज्याच्या अंगावर पट्टे असतात, तो तरसअसतो, वाघ नाही.’’ तेव्हा तो म्हणाला ‘‘तरस मला ओळखू येतो.’’ मग तो सांगू लागला, ‘‘त्याचा रंग तांबूस आहे. त्याच्यावर गोल ठिपके आहेत. त्याला मांजरीसारखी लांब शेपटी आहे. कान लहान आहेत.’’

एवढं सांगितल्यावर मी त्याला म्हणालो ‘‘की हो, तो वाघच आहे.’’ मग आम्ही चालू लागलो. तर म्हणे, ‘‘अहो, त्याच्या गळ्यात चाळणीची पट्टी कोणीतरी बांधली आहे.’’ तर मग मला हसू आलं. मी म्हणालो, ‘‘अरे, काय वाघाच्या गळ्यात चाळणीची पट्टी कोण बांधील?’’ तर तो म्हणाला ‘‘मी खूप जवळून त्याला पाहिलंय. तो माझ्याकडे पाहत निघून गेला तेव्हा मी त्याच्या गळ्यात चाळणीची पट्टी किंवा कुत्र्याच्या पट्ट्यासारखा पट्टा पाहिला आहे.’’ तेव्हा मी त्याचा समजूत काढली. कचरा उकरायला डुक्कर येतात. डुक्कर खायला वाघ गेला असेल आणि त्या

कचऱ्यातलं काहीतरी गळ्यात अडकलं असेल. मग त्याला ते खरं वाटलं. मग तो म्हणाला, ''हा, हा, कचऱ्यातूनच काहीतरी गळ्यात गेले असेल.'' परंतु, त्याने जे पाहिलं, ती चाळणीची पट्टी नव्हती. तर ती खरोखर कॉलर होती. तो होता जय. आणि जाता जाता तो म्हणाला, ''वाघ गरीबच होता. त्यानं मला काहीच केलं नाही.''

**जीवशास्त्र**

तंत्रज्ञानातील आणखी एक प्रगती म्हणजे वन्यप्राण्यांच्या गळ्याभोवती घातले जाणारे पट्टे. या विशिष्ट पट्ट्यांमुळे प्राण्याच्या हालचालीबद्दलची प्रत्यक्ष माहिती मिळवता येते. या पट्ट्यामध्ये एक चिप असते जी आकाशातील कृत्रिम उपग्रहाशी जोडलेली असते. या चिप मध्ये पट्ट्याचे ठिकाण आणि वेळ याची माहिती साठवली जाते. त्यानंतर ही सर्व माहिती सिमकार्ड वापरून एस.एम.एस. द्वारे पाठवली जाते. आम्ही प्राणीशास्त्रज्ञ मग पुढच्या दिवशी त्या ठिकाणी जाऊन तेथील परिसराच्या वैशिट्यांची नोंद घेतो. आम्हाला त्या ठिकाणी त्या प्राण्याच्या खाण्याचे अवशेष मिळाले तर त्याचीही नोंद घेतो. यामुळे आम्हाला बिबट्या कुठचा परिसर वापरतो आणि त्याचे खाद्य काय आहे याची चांगली कल्पना येते.

आजकाल तंत्रज्ञानात एवढी प्रगती झाली आहे की एखाद्या भागात वापरल्या जाणाऱ्या सर्व पट्ट्यांकडून आम्हाला त्यांचे ठिकाण हवे असलेल्या कुठल्याही वेळेला मिळवता येते. ह्या मार्गाने आम्हाला एका क्षेत्रातील सर्व बिबट्यांचे ठिकाण समजते...हे बिबटे एकमेकांना सहसा भेटतात का? आमच्या कामामुळे पहिल्यांदाच हे शोधले गेले की असे बिबटे एकमेकांना भेटतात आणि बऱ्याचदा ते आजूबाजूच्या शेतातच बसलेले असतात. ह्याने हेसुद्धा सिद्ध होते की जर एका प्राण्याला काही झाले तर दुसऱ्या प्राण्याला ते कळते. आम्हाला हेही समजले की जरी आजूबाजूला माणसे असली तरी बिबटे ऊसाच्या शेतात पूर्ण दिवस बसून राहतात आणि फक्त रात्रीच बाहेर पडतात.

जास्त महत्वाचे म्हणजे आम्हाला हे समजले की कधीही त्यांच्या क्षेत्रातून बाहेर न पडलेले बिबटे, विशिष्ट परिसरात स्थायिक झालेले प्राण्यांना त्या क्षेत्रातील प्रत्येक घर माहीत असते. मधून मधून ते शेतकऱ्याने गोठ्याचा दरवाजा उघडा तर ठेवला नाही ना हे बघण्यास एकाच ठिकाणास भेट देतात. ह्या प्राण्यांना कुठल्या घरात रोज रात्री माणसे अंगणात झोपतात हे सुद्धा माहीत असते. असे प्राणी माणसांपासून नेहमीच दूर राहतात आणि त्यांना घाबरून असतात. जर अश्या प्राण्यांना त्यांच्या क्षेत्रातून बाहेर काढले गेले तर ती सर्व मांजरींप्रमाणे आपल्या घरी परत जाण्याचा प्रयत्न करतात. दुसरी गोष्ट म्हणजे, आधीच्या त्यांच्या घराशी तुलना करता नवीन प्रदेश कसा वापरायचा हे त्यांना माहीत नसते. असे भुकेले प्राणी लहान मुलांवर हल्ला करू शकतात. आमचे बिबटे एक-दोन आठवड्याच्या कालावधीत ५०-१०० किलोमीटर अंतर पार करतात आणि आधीच्या आपल्या घरी पोहचल्यावर तिथेच रुळतात आणि पलीकडे जात नाहीत.

एका चांदण्या रात्री जेव्हा एक शेतकरी अशाच एक बंगल्यावरून आकडा टाकण्यासाठी गेला; तेव्हा त्याला हे दोन पट्टे घातलेले वाघ बंगल्याच्या गच्चीवर खेळताना दिसले.

## छतावर झोप आम्हालाही आवडते!



**एका आजोबांची गोष्ट**

गणोरे गावातील घटना. रात्रीची वेळ होती. घराजवळ विहीर असल्यामुळे रात्रीच्या शांततेमुळे विहिरीत काहीतरी पडल्याचा मोठा आवाज झाला. घरातील सर्व माणसे जागी झाली. घराबाहेर येऊन कानोसा घेऊ लागली. काही आवाज येतो का हे ऐकू लागली. रात्री लाईट नव्हती. सगळे जागे झालेले. सगळ्यांचा मोठ्याने बोलण्याचा आवाज ऐकून घरातील म्हातारा बाहेर आला. त्याला कोण काय बोलत आहे हे काहीच समजत नव्हते. म्हणून तो घरामागे गेला. घरातील माणसांना वाटले म्हाताराच विहिरीत पडला. त्यातील एकजणाने म्हातारा खोलीत आहे की नाही हे डोकावून पाहिले. तर म्हातारा तिथे नव्हता. म्हातारा विहिरीत पडला अशी त्यांची तशी खात्री झाली. या आवाजाने शेजारचे लोक तिथे आले. त्यांच्याकडे बॅटऱ्या होत्या. एकजण घरामागे गेला तर त्याला म्हातारा तिथे बसलेला दिसला. म्हाताऱ्याला त्याने विचारले ''बाबा का मागे येऊन गप्प बसले?'' म्हातारा म्हणाला, ''काय चालले आहे? मला काहीच समजत नाही. म्हणून मी येथेच थांबलो.''

बाबा आहेत हे समजताच लोकांना वाटले की आपल्या विहिरीत कोणी जीव तर नाही ना दिला? मग त्यांनी विहिरीत बॅटरी लावून पाहिले. तर त्यांना विहिरीत बिबट वाघ दिसला. सकाळी त्यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना सांगितले. मग वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी बिबट्यासाठी जाडी सोडली. मग बिबट्या जाडीवर बसून राहिला. मग विहिरीला गोल कंपाऊंड केले. त्यात पिंजरा लावला. बिबट्याला वर चढण्यासाठी लाकडी शिडी लावली. बिबट्या दुसऱ्या दिवशी रात्री वर चढून आला आणि पिंजऱ्यात अडकला. पिंजरा सुगाव नर्सरीत आणला. त्या बिबट्याचे वय १.६ वर्षे असेल. त्याचे वजन तीस किलोपर्यंत असेल.

**आजोबा आणि इतर पुर्नवसित प्राणी –** ***विद्या आत्रेय यांचे निवेदन***

आम्ही एकूण चार बिबट्यांना रेडिओ कॉलर पट्टे घातले होते. त्यांपैकी दोन प्राणी आम्ही ज्या भागातून पकडले त्याजवळच सोडण्यात आले. बाकी दोघांना ५० किलोमीटरपेक्षाही जास्त दूर अंतरावर सोडण्यात आले. या प्राण्यांमधील आजोबा नावाच्या बिबट्याने फारच वेधक गोष्ट केली. तो आळेफाट्याजवळील एका विहिरीत मिळालेला पाच-सहा वर्षांचा मोठा नर होता. तो एका कुत्र्याच्या मागे लागला असताना कुत्र्याने विहीरीत उडी म ारली आणि त्यापाठोपाठ आजोबानेही.'' सकाळी जेव्हा लोकांनी बघितले तेव्हा त्यांना बिबट्याच्या पाठीवर बसलेला कुत्रा दिसला. इतरत्र कुठेही जागा नसल्याने बिबट पंपावर बसला होता. खाली सोडल्या गेलेल्या पेटीत कुत्र्याने उडी मारली व त्याची सुटका झाली. रात्री लावण्यात आलेल्या शिडीवरुन बाहेर चढून येताच बिबट पिंजऱ्यात अडकला. यानंतर आम्ही त्याला जी.पी.एस्. पट्टा घातला. इतर अनेक बिबट्यांप्रमाणे त्याला माळशेज घाटाच्या पायथ्याशी सोडण्यात आले. पण त्याने आम्हाला सर्वांना आश्चर्यचकित केले. तो सरळ मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात चालत गेला. हे १२० किलो

मीटरच्या आसपासचे अंतर त्याने तीन आठवड्यात चालत पार केले. तो सकाळी जंगलातून प्रवास करायचा तर रात्री गावांमधून. त्यानंतर आमच्या पट्ट्याचे संकेत मिळायचे थांबायच्या आधी तो दोन महिन्यांसाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात राहिला.

सीता अजून एक अशी बिबट होती जिच्याबद्दल आम्हाला निरपवादपणे आदर वाटण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. एका सकाळी नानशीला गावकऱ्याने तिला गावाच्या आजूबाजूला फिरताना बघितले आणि ती पकडली गेली. अचानक दचकल्यामुळे ती एका घराच्या आत पळाली. घरातील लोक धावत बाहेर आले आणि त्यांनी दरवाजा बंद केला. तिला नंतर पिंजऱ्यात पकडून नाशिकला नेले. तिथे आम्ही तिला पट्टा घातला. तिलाही इतर बिबट्यांप्रमाणे जव्हारच्या जंगलात सोडण्यात आले. ही मे २००९ सालची गोष्ट आहे. आम्ही तिला पट्टा घातला तेव्हा ती गरोदरही होती. तिला सोडण्याच्या एका आठवड्यानंतर ती २५ किलोमीटरच्या आसपास तिच्या घराच्या दिशने चालत निघाली. पण मग परत तिला जिथे सोडण्यात आले होते त्या ठिकाणी आली. तिने तिथेच पिल्लांना जन्म दिला आणि चार महिने त्याच भागात राहिली. सकाळी जंगलात आणि रात्री गावांच्या जवळ. एकाएकी ऑक्टोबर महिन्यात ती तिला ज्या ठिकणी पकडले होते तिथे परतली. ही जागा कदाचित तिचे घर होण्यासाठी योग्य असेल. ती ह्या ठिकाणी मे २०१० पर्यंत होती. आम्ही वापरलेल्या प्रकारचे पट्टे साधारणपणे एका वर्षात गळून पडतात त्याप्रमाणे त्यानंतर तिचा पट्टा आपोआप गळून पडला. बहुतेक ती परत आधीच्या ठिकाणी निघाली कारण तिची शावके ५० किलोमीटरचे अंतर चालण्याइतपत मोठी झाली होती. सीता तिचे घर चार महिन्यांच्या कालावधीनंतरही विसरली नव्हती. अशाप्रकारची घरी परत जाण्याची प्रवृत्ती इतर अनेक प्राण्यांमध्ये पाहिली गेली आहे, अगदी आपल्या घरातील पाळीव कुत्रे-मांजरीमध्येसुद्धा.



*गळ्यातील पट्ट्याचे भाग*

**माळीझाप २**

माळीझापला एका वायरमनच्या शेतात आम्ही फिरत होतो. जेथे ओली जमीन असेल अश्याच शेतातून फिरत होतो. फिरत फिरत आम्ही एका विहिरीवर गेलो. आम्हाला वाटले तेथे बिबट्याचे ठसे मिळतील. जवळच टोमॅटोच्या शेतात पाणी भरलेले होते. विहीरीवर एक माणूस झोपलेला होता. आम्ही गेल्यावर तो उठून बसला. मी त्याला विचारले, ''वाघ येतो का?'' तेव्हा त्यानं सांगितलं... ''मी रात्री येथे टोमॅटोला पाणी भरत होतो. मी पाणी भरत असताना विहिरीवर मला दोन कान दिसल्यासारखे वाटले. मी विचार केला जाऊ द्या, असेल काहीतरी. पण मला रहावत नव्हतं. मी प्रत्येक वेळी बारं देत होतो आणि वर पाहिलं तर कान

दिसायचे. जेव्हा माझं पाणी भरुन झालं तेव्हा मी विहीरीकडं आलो. बॅटरी लावून बघितली तर ते दिसणारे दोन कान म्हणजे प्रत्यक्ष वाघ बसलेला होता. मी जवळ आलेलो पाहून तो उठला आणि ढिगाऱ्याच्या खाली निघून गेला.'' जर बिबट्याला त्रास दिला नाही तर तो माणसाला काही करत नाही आणि अंगावर पण येत नाही.

## हेच ते विहिरीवरचे कान!



### आंबड

आंबड गावात बी.एस.एन.ल. चा चर खोदण्यासाठी बाहेरील प्रांतातील यू.पी.एम.पी. मजुर आले होते. त्यांचं खोदकाम चालू असताना त्याना जंगलाच्या बाजूनं आवाज आला. त्यांनी ओळखलं, हा वाघाचा आवाज आहे.

त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी जंगलाच्या बाजूने रस्त फिरून पाहिलं. त्यांना वाघ ह्या रस्त्यावरुन जातो अशी खात्री पटली. नंतर त्यांनी वाघाला पकडण्यासाठी सापळा लावला. त्यानंतर काही दिवसांनी वाघ त्या सापळ्यात आडकला. सापळ्यात वाघ आडकल्यामुळे सुटकेसाठी खूप आरडाओरड करत होता. ती शिकारीवाली माणसे जवळच होती. ते वाघाला मारणार होते. परंतु वाघाच्या ओरडण्याने वस्तीवरील लोक जागे झाले आणि वाघाच्या दिशेने गेले. तर त्यांनी वाघ सापळ्यात आडकलेला पाहिला.

वस्तीवरील लोकांना पाहिल्यावर शिकारीवाले लपून बसले. शिकारीवाल्यांना गावकऱ्यांनी ओळखले होते. गावकऱ्यांनी डिपार्टमेंटला कळविले. गावाच्या मदतीने बिबट्याला सापळ्यातून सोडवले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्या शिकाऱ्यांना डिपार्टमेंटने पकडून पोलिसात बंद केले. गावकऱ्यांची मदत आणि सावधगिरीमुळे एका वाघाचे प्राण वाचले.

### बेल्हे

बेल्हे गावापासून पूर्वेला काहीश्या अंतरावर लहीत म्हणून एक गाव आहे. रात्री वाघाने शिकारीसाठी कुत्र्याचा पाठलाग केला. कुत्रा पळताना विहिरीत पडला. त्याचा पाठलाग करत असलेला बिबट्या वाघही विहिरीत पडला. वाघही विहिरीत आणि कुत्राही विहिरीत.

पाण्यापासून दहा फुटावर मोटार ठेवलेली होती. वाघ प्रयत्न करुन मोटारवर येऊन बसला. ते पाहून कुत्राही प्रयत्न करुन वर चढुन आला आणि वाघाच्या अंगावर बसून राहीला. वाघ शांत डोळे मिटून होता. हा प्रकार विहीर मालकाने पाहिला. त्याने फॉरेस्ट डिपार्टमेंटला कळवले.

डिपार्टमेंटची माणसे आल्यावर प्रथम टोमॅटोच्या क्रेटमधून कुत्र्याला वर काढले. कुत्रा वर काढल्यावर पाच-दहा मिनिटातच मेला. जोपर्यंत वाघ आणि कुत्रा विहीरीत होते तोपर्यंत वाघाने कुत्र्याला काहीही केले नाही. कारण वाघही संकटात आणि कुत्राही संकटात. परंतु कुत्रा वर काढल्यावर मेला म्हणजे त्याला ॲटॅक आला असेल. नंतर सर्व बाजूंनी विहीरीला काट्या लावल्या. पिंजरा लावला. वाघाला वर येण्यासाठी शिडी लावली. शिडीच्या सहाय्याने वाघ वर आला आणि पिंजऱ्यात अडकला.

# इकडे पाणी तिकडे वाघ!



### अगस्ती कारखाना, अकोले

अगस्ती सहकारी साखर कारखान्यावर एक कामगार उपोषणासाठी बसला होता. त्याची कारखान्याकडे जमीन होती. त्यातील काही जमीन कारखान्यास दिली होती. त्याच्या मोबदल्यात त्याला कारखान्यात कामाला घेतले होते. त्याचे कारखान्यात कामावर लक्ष नव्हते. तो संध्याकाळी सुटी झाल्यावर त्याच्या पिशवीत कारखान्याचे सॅप माल, पान्हे, पक्कड, वायर घरी घेऊन जात असे. त्यामुळे कारखाना प्रशासनाने त्याला कामावरून काढून टाकले होते. कारखाना मॅनेजमेंट त्याच्याकडे लक्ष देत नव्हती. कारखान्याचे लक्ष त्याच्याकडे लागण्यासाठी तो दररोज काहीतरी नवीन युक्ती करत असे.


एका रात्री तो आणि त्याचा मित्र अकोले गावाजवळील एका वस्तीत कार्यामाच्या स्वयंपाकासाठी गेले. तिथे लाईट नव्हती. तो समोरच्या पोलवर आकडा टाकण्यासाठी चढला. तिथे त्याला शॉक बसला. आणि तो खाली पडला. त्यावेळेला त्याच्या हाताला लागले आणि तोंडाला घसरले. रात्री तो पुन्हा कारखान्यावर उपोषणाच्या ठिकाणी जाऊन झोपला. त्याच वेळी त्याने प्लॅन केला.

सकाळी त्याने हाताला, तोंडाला फडके, रूमाल बांधला. लोकांनी त्याला विचारले, ''का फडके बांधले?'' त्याने सांगितले, ''रात्री बारा वाजता वाघाने माझ्यावर हल्ला केला. मला ओढीत पन्नास साठ फूट नेले होते. परंतु, पाच कुत्रे वाघावर धावून गेल्यामुळे त्याने मला सोडून दिले.'' लोकांनी सांगितले सरकारी दवाखान्यात जा.

तो मग सरकारी दवाखान्यात गेला. मलमपट्टी करून घरी आला. त्यानंतर आठ दिवसांनी ''मला वाघानं जखमी केलं आहे, मला सरकारी मदत द्या'' असे तो म्हणू लागला. त्याला डिपार्टमेंटनं डॉक्टरचं सर्टिफिकेट आणण्यास सांगितले. ते त्याला डॉक्टर देईनात. कारण त्याला बिबट्याने जखमी केलंच नव्हतं. विनाकारण बिबट्याच्या नावान तक्रार!

**माळीझाप**

शनिवारचा दिवस होता. त्या दिवशी तारीख होती १३-०२-१०. मला फोन आला. दुपारी दीड वाजता. बंगल्यात वाघ घुसला. ठिकाण होतं माळीझाप. मी त्याला पकडण्यासाठी पिंजऱ्याची व्यवस्था केली. घराच्या दरवाजात पिंजरा ठेवला आणि आम्ही सर्व काम करणारे शांत झालो. जेव्हा आम्ही रिकामे झालो तेव्हा मी त्या घरातील माणसांची चौकशी केली.



त्यांना मी विचारले, ''तुम्हाला वाघाची भीती कशी वाटली?'' ते म्हणाले, ''आमच्या घरी महाशिवरात्रीसाठी पाहुणे आलेले. आम्ही सगळे जेवणासाठी किचनसमोरील हॉलमध्ये एकत्र बसलो होतो. आमचं सर्वांचं जेवण झालं. आमच्या समोरची जेवणाची ताटं तशीच होती. आमच्या घरातल्या माणसांच्या गप्पागोष्टी चालू असतानाच एक भला मोठा प्राणी आमच्यासमोर आला. आम्हाला वाटलं हे काय नवीन? आम्ही सर्वजण एका क्षणात शांत झालो. बिबट्या वाघाने आमच्याकडं वळून पाहिलं. आम्हाला काही केलं नाही. तो लगेच पुढच्या रूमकडे गेला. तोपर्यंत आम्ही आमच्या रूमचा दरवाजा लावून घेतला. वाघ समोर रूमकडे जाऊन येणार तोच बाहेरून आवाज आला. त्यांनी किचनचा दरवाजा लावून घेतला.

बाकी दोन दरवाजे बंदच होते.त्यांनी आम्हाला आवाज दिला की तुमच्या घरात वाघ घुसलाय. मग लोकांनी आम्हाला बाहेर काढण्यासाठी जाळीचे (खिडकी) गज कापले आणि आम्हाला एकेक करून बाहेर काढले.

बिबट्याला बघण्यासाठी पाच हजाराची लोकसंख्या जमली होती. बिबट्याला मी बघितले. तो किचनमध्ये होता. लोकांनी त्रास दिल्यामुळे तो संडास बाथरूमवरील लॉफ्टवर (पोर्च) जाऊन बसला. त्याला बाहेर येण्यासाठी लोकांनी खूप सुतळी बॉम्ब वाजवले. त्यामुळे तो पूर्ण लपून बसला. तो पुन्हा खाली येईना. शेवटी रात्री तीन वाजता आम्ही घर मालकाची परवानगी घेऊन घराच्या दोनतीन विटा काढल्या आणि तो जिथे बसला होता तेथून त्याला बांबूने ढकलून काढले. तो खाली उतरला. पिंजऱ्यात न जाता पुन्हा वर चढला. लॉफ्टवर बसला. पुन्हा तेच केले. त्याला खाली ढकलले. तो घरात पळाला आणि पिंजऱ्यात उतरला.

मी लोकांना विचारले वाघ दिवसा घरात कसा घुसला? तेव्हा लोकांनी सांगितले, बिबट्या कॅनालवर पाणी पीत होता. मुलांनी त्याला पाहिलं. खूप मुलं जमा झाली. त्यांनी त्याला खडी मारून पुढं हाकललं. त्याला लपून राहण्यासाठी जागा नव्हती. तो तसाच चालत राहिला आणि सोर गावात घुसला. गावात लपण्यासाठी जागा नव्हती. तो तसाच चालत राहिला. लोकांचा जमाव त्याच्या मागे होता. तो घाबरून तसाच चालत राहिला. त्याला समोर घर उघडं दिसलं. लपण्यासाठी बचावासाठी तो घरात घुसला.

**पिंजऱ्यात माणूस अडकला**

अकोले गावाच्या पश्चिमेला शेतकी फार्महाऊस आहे. तेथे वनविभागाची रोपवाटिका होती. अकोले गावात आणि आजूबाजूला वाघाचा खूप त्रास होता. अकोले गावातील लोकांनी पिंजरा लावून वाघ पकडून न्या असे अर्ज ऑफीसला दिले. भरपूर लोकांची ओरड म्हणून अकोला रोपवाटिकेत नदीच्या जवळ पिंजरा लावला होता. पिंजऱ्याच्या सर्व बाजूंनी हिरवी झाडाची पाने, फांद्या बांधल्या होत्या. पिंजऱ्याला जोडून भक्षाचा पिंजरा लावला होता. त्यात कुत्र्याचे पिल्लू ठेवले होते. दोन दिवस झाले वाघ पिजऱ्यात अडकेना. पिंजऱ्याच्या देखभालीसाठी काही माणसं नेमली होती.

गुरुवारचा दिवस होता. गुरुवार म्हटलं की अकोलेचा बाजार. नदीला पाणी कमी होतं. त्यामुळे नदीपलीकडील लोकांचं येणे-जाणे नर्सरीमधून होतं रात्री ९ चा सुमार असेल. एक आदिवासी ठाकर समाजाचा माणूस त्या रस्त्याने जात होता. भक्षाच्या पिंजऱ्यात कुत्र्याचे पिलू ठेवलं होतं. ते रात्री ओरडत होतं. रस्त्यानं जाणाऱ्या माणसानं पाहिलं. कुत्र्याचं पिल्लू का ओरडत आहे. तो दारू प्यालेला होता, त्यामुळे त्याला असं वाटलं की कुत्र्याचे पिल्लू कोणी बांधून ठेवलं आहे. त्याला सोडून द्यावं म्हणून तो पिंजऱ्यात घुसला. आणि काय! पिंजऱ्याचा दरवाजा बंद झाला! त्याला काही सुचेना. आपण आपोआप कसे बंद झालो

# बेवडा वाघोबा!



पिंजऱ्याच्या राखणीसाठी असणाऱ्या माणसांनी आवाज ऐकला...पिंजऱ्याचा दरवाजा बंद झाला...वाघ पिंजऱ्यात अडकला...चला काम झालं! अधिकाऱ्यांना सांगून देऊ. रात्रीचा टाईम असल्यानं कोणीही खात्री केली नाही. कुत्र्याचं ओरडणं बंद झालं. कारण त्याच्या जोडीला माणूस आला होता. कर्मचाऱ्यांना वाटलं वाघाला घाबरुन कुत्रा गप्प झाला.

सकाळी वाघ अडकलेला बघण्यासाठी वन कर्मचारी गेले. ते खूप हळू-हळू गेले कारण वाघ घाबरुन आरडाओरड करु नये म्हणून. ते पिंजऱ्याजवळ जाताहेत तो पिंजऱ्यात माणूस! त्याला बाहेर काढले आणि विचारले, ''आत कशाला गेला होतास?'' तो म्हणाला, ''मला वाटलं कोणीतरी कुत्र्याचे पिलू बांधून ठेवले आहे. आणि ते ओरडत होते. म्हणून त्याला सोडवायला गेलो होतो.''

**विहिरीत पडलेला बिबट**

अकोले गावापासून अठरा किलोमीटर अंतरावर असलेले गणोरे गाव. त्या गावात घडलेली घटना.

मी आणि वनरक्षक आर.एच. पांडे आम्ही दोघेही समशेपूर येथे चालू असलेल्या वनबंधाऱ्याच्या कामावर होतो. आमच्या तेथे एक वॉचमन आला. आणि म्हणाला, ''ऑफिसवरून फोन आला होता. गणोरेला विहिरीत एक वाघ पडला आहे. तरी तुम्हाला तेथे बोलावले आहे.'' मग आम्ही गणोरे गावाला पोहचलो. जाताना आम्ही आमच्याबरोबर सर्व वॉचमन घेतले. घटनास्थळी आम्ही जेव्हा पोहोचलो, तर तेथे खूप लोकांची गर्दी. आम्ही सर्वांत अगोदर लोकांना विहिरीपासून लांब केले. परंतु लोकांची गर्दी काही केल्याने कमी होत नव्हती. जो तो विहिरीत वाघ बघण्यासाठी डोकावत असे. आम्ही भरपूर प्रयत्न केला लोकांना थांबवण्यासाठी. लोक थांबत नव्हते. शेवटी पोलिसांना बोलावण्याची वेळ आली. त्यावेळी आम्हाला वनपाल जे.डी. गोंदके भाऊसाहेब होते. त्यांनाही माहिती मिळताच ते पण आले. मी स्वतः विहिरीच्या मालकाला विचारलं, ''वाघ विहिरीत कसा पडला?'' विहिरीचं काम चालू होतं. विहीर जवळपास पंचावन ते साठफूट खोल झाली होती. तरीपण वाघाची कोठलीही मोडतोड झाली नव्हती. इतक्या खोल विहिरीत पडलेला वाघ व्यवस्थित राहिलाच कसा? आणि मग मी त्याला सर्व काही कसं घडलं असं विचारलं

तेव्हा त्याने सांगण्यास सुरुवात केली. विहिरीचं काम करणारी माणसं सकाळी आली. त्यांना क्रेनमधून खाली सोडलं. लोकांच्या आवाजानं विहिरीत पडलेला वाघ माडीच्या मागे लपून बसला होता. हे सर्वजण ठेवण्यावर उतरले. त्यांनी तेथे तंबाखू विडी ओढल्या आणि त्यातला एक मुलगा विहिरीत तळात उतरला. तर त्याला वाघाची शेपटी दिसली. त्याचबरोबर बिबट्या वाघ माडीच्या बाहेर आला आणि त्याने त्या मुलावर हल्ला केला. त्याचे अंगावरचे कपडे फाडून टाकले. नख्याचा खूप मार लागला. रक्तबंबाळ झाला. तरी वाघ सोडत नव्हता. हे त्या मुलाच्या वडिलांनी बघितल्यावर तो मुलाला वाचवण्यासाठी खाली उतरला. वाघाने मुलाला सोडले आणि मुलाच्या वडिलांवर हल्ला केला. त्याला पण रक्तबंबाळ केले. त्याच्यावर झालेला हल्ला पाहून वर बसलेली माणसं जाइवर पळापळ करू लागली. वाघाने त्यांच्यावर उडी घेऊन त्यांनाही जखमी केले. नंतर त्या मालकाला विहिरीवर आरडाओरडा ऐवू आला. तो धावतच विहिरीवर आला. आणि बघतोय तर विहिरीत वाघ. आणि ही रक्तबंबाळ झालेली माणसे. त्याने आरोळी ठोकली. लौकर माडीत बसा. ते सर्वजण माडीत बसेपर्यंत बिबट्याने पुन्हा झेप



घेतली. क्रेन चालू झाले. बिबट्या वाघ क्रेन माडीला लगटून वीस फूटाच्या वर आला. क्रेन थांबवण्यास सांगितल्यावर माडीला हिसका बसला. आणि वाघ पुन्हा विहिरीत पडला. त्या लोकांना विहिरीतून वर काढल्यावर त्यांना दवाखान्यात नेले.

आम्ही बिबट्याला वर कसे काढायचे असा विचार करू लागलो. सर्वात अगोदर आम्ही वॉचमन, वनरक्षक, वनपाल मिळून विहीरीला काट्याचे कुंपण तयार केले. तो दिवस आणि पूर्ण रात्र गेली तरी वाघ विहिरीतून बाहेर येईना.

पहाटेच्या सुमारास वाघ वर चढून आला. पिंजऱ्यात घुसला. दरवाजा बंद झाला नाही. तो पिंजऱ्यातून उडी मारुन निघून गेला. सकाळी सहा वाजता मी विहिरीत डोकावलो. तो मला विहिरीत वाघ दिसेना. मी वनपाल गोंदके साहबांना सांगितलं. ते म्हणाले ''असेल विहिरीतच.'' विहीर लहान असल्याने विहिरीत काहीच दिसत नव्हतं. मग आम्ही वाघ विहिरीत आहे का नाही खात्री करण्यासाठी विहिरीत जिवंत कोंबडी सोडली. कोंबडी विहिरीत फिरत होती. वाघ विहिरीत नाही याची खात्री झाली.

सकाळी ९ वाजता वाघ बघण्यासाठी पुन्हा लोकांची गर्दी होऊ लागली. आम्ही लोकांना विहिरीकडे जाऊ दिलं नाही. मग आम्ही तेथून पळ कसा काढायचा याचा पूर्ण विचार केला. कारण आम्ही विहिरीवर आलेल्या लोकांना आणि वार्ताहरांना वाघ विहीरीत किंवा पिंजऱ्यात दाखवू शकत नव्हतो आणि त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरही देऊ शकत नव्हतो कारण ते आमच्यावर बिबट्याला सोडून दिल्याचा आरोप करणार हे आम्हाला माहीत होते. मग गोंदके साहेबांनी योजना आखली. काहीतरी खाऊन येण्याचे निमित्त केले आणि आम्ही वडगाव लांडगा मार्गे अकोलेला आलो. त्यानंतर विहिरीत असणारे आमचे सहकारी एक-एक करुन सर्वजण विहिरीतून निघून गेले.

## झाडावर चढलेला बिबट

उन्हाळ्याचे दिवस होते. आम्ही बिबट्याची विष्ठा शोधत होतो. खूप ऊन झाल्यामुळे आम्ही एका मित्राच्या घरी पाणी पिण्यासाठी गेलो. परंतु घरी मित्र नव्हता. त्याची बायको, एक मुलगी आणि मुलगा हे घरी होते. मला त्यांनी पाहिल्यावर विचारलं, ''खूप दिवसांनी आमच्या घरी यायला कसे जमलं?'' मग मी त्यांना सांगितलं, ''मी वाघ कोठे राहतो, कोठून जातो, हे बघण्यास आलो आहे.'' मग त्यांनी मला एक खूप छान कहाणी सांगितली.

मुलगी म्हणाली, ''काका, मी वाघ बघितला. तो झाडावर होता. काय झालं. सायंकाळचे पाच वाजले होते. मी अभ्यास करीत होते. अभ्यास चालू असताना माझे लक्ष ऊसाच्या बाजूला असलेल्या लिंबाच्या झाडावर गेलं. मला वाटलं खूप मोठं वानर लिंबाच्या झाडावर बसलं आहे. आणि ते आमच्या घराकडे बघत होतं. मग मी आईला हाक मारली. मम्मी, मम्मी, लिंबावर बघ किती मोठे वानर बसलं आहे. मम्मीने पाहिले तर काय? खूप मोठा वाघ लिंबाच्या झाडावर बसून आमच्या घराकडे बघत होता. घरापुढे आमच्या शेळ्या बांधल्या होत्या. आई ओरडली, ''कसला वानर

तो? वाघ आहे. तो आपल्या शेळ्यांकडे बघत आहे. चल लवकर शेळ्या सोडू लाग. शेळ्या घरात बांधून टावू म्हणजे तो इकडं येणार नाही.'' असं आईनं म्हटल्यावर मी एक शेळी आणि आईने एक शेळी सोडली, घरात बांधली. बाहेर येऊन त्याच्याकडे पाहतो तर तो झाडावरून खाली उतरत होता. त्यानंतर तो ऊसात घुसला. आम्ही लवकर घर बंद केलं

रात्री वाघ आला आणि आमचे कुत्र्याचे पिल्लू घेऊन गेला. या घटनेच्या अगोदर पण बिबट्यानं आमची एक शेळी मारून खाल्ली होती.



# इतर प्राणी

## गर्दणी ३

गर्दणी गावातील एका माणसाला ऊसाच्या शेतात एक वाघाचे पिल्लू सापडलं तो त्याला घरी घेऊन गेला. त्याला टोमॅटोच्या जाळीत ठेवलं. ते पिल्लू असेल साधारण एक महिन्याचं. तो त्याला दररोज दूध देत असे. पण ते पिल्लू दूध पित नव्हते. नंतर त्याने बऱ्याच लोकांना सांगितले की मी वाघाचे पिल्लू पाळतोय. पण ते दूध का पित नाही कळत नाही.

एक दिवस त्याची माझी भेट झाली. तो मलाही म्हणाला, ''मला वाघाचे पिल्लू सापडलं आहे.'' म्हणून बघण्यासाठी मी त्याच्या घरी गेलो. मी त्या पिल्लाला पाहिल्यावर त्याला सांगीतलं की  हे पिल्लू वाघाचे नसून जंगली मांजरीचं आहे. त्याला वाघाचे पिल्लू कसे असते ते मी त्याला समजावून सांगितले. त्याची खात्री पटल्यावर त्यानं त्या पिल्लाला ऊसात ज्या ठिकाणी सापडलं होतं, त्या ठिकाणी सोडून दिलं. त्यानंतर आठ-दहा दिवसांनी त्याच ऊसाच्या शेतात रानमांजरीबरोबर त्यानं पिल्लू पाहिली आणि त्याची खात्री झाली, आपण घरी आणलेलं पिल्लू रानमांजराचं होतं. त्याला जेथे पकडले होते तेथेच सोडल्यामुळे पिल्लाची आणि आईची भेट झाली.

## खांडगाव

खांडगावची गोष्ट. ऊसाची तोडणी चालू होती. तोडीवाल्यांना ऊसाच्या शेतात तीन पिल्ले दिसली. त्यांनी त्यानंतर ऊस तोडणी बंद केली. ऊस-मालकाला त्यांनी सांगितले इथे ऊसात वाघाची पिल्ले आहेत तेव्हा आम्ही ऊस तोडीत नाही. वाघीण इथेच असेल. मग ऊस-मालकानं शेतात पिल्लं पाहिली. त्यांनी संगमनेर फॉरेस्ट ऑफीसलाही माहिती दिली. त्यानी त्याच दिवशी शेतात पिंजरा लावला. पिल्लांसाठी सावली केली. त्यांच्या देखरेखीसाठी एक कर्मचारी ठेवला.

संध्याकाळी तो घरी आला. सकाळी पुन्हा शेतात पाहिले तर एक पिल्लू गायब झालेले. त्याने लोकांना सांगून दिले की वाघीण एका पिल्लाला घेऊन गेली व दोन इथंच आहेत. त्यानंतर त्या पिल्लांची नीट पहाणी केली असता ती पिल्ले वाघाची नसून रानमांजरीची होती.

ह्यावरुन सर्व कर्मचारी आणि गावातील लोकांना वाघाची पिल्ले आणि मांजरीची पिल्ले ओळखण्याचे ट्रेनिंग देण्याची गरज आहे हे लक्षात येते.

**तरस शेकईवाडी नर्सरीजवळ**

शेकईवाडी गावातून मी सुगाव नर्सरीला जात होतो. रस्त्याच्या बाजूला खूप लोकांची गर्दी जमली होती. म्हणून मी पण थांबलो आणि एका मुलाला विचारलं, ‘अरे ही एवढी गर्दी कशाची?’ तो म्हणाला, ‘काका, तुम्ही जाऊन बघा. आम्ही दोन वाघ दोरीला बांधून ओढीत आणलेत.’ मग मी गाडी बाजूला उभी केली आणि जमा झालेल्या लोकांकडे गेलो तर काय! साधारण १०, १२ वर्षाच्या मुलांनी दोन तरस ओढीत गावात चालवले होते. मी गेल्यावर त्यांना बोललो, ‘अरे थांब! हे काय करुन राहिले?’ ते म्हणाले, ‘आम्ही मेलेले वाघ गावातल्या लोकांना बघण्यासाठी घेऊन चाललो आहोत.’ त्यावर मी म्हणालो, ‘हे वाघ नाहीत, हे तरस आहेत.’ त्यानंतर त्या मुलांनी त्या तरसांना तेथेच सोडून दिले. मग लोकांनी मला विचारलं असता मी लोकांना सांगितलं, ‘वाघाच्या अंगावर गोल ठिपके असतात. वाघाची शेपूट लांब असते. वाघाचे तोंड गोल असते, तरसाचे तोंड कुत्र्या-कोल्ह्यासारखे असते. वाघाच्या अंगावर लांब केस नसतात, कान लहान असतात.’ त्यानंतर आम्ही त्या तरसांना नर्सरीत नेऊन जाळून टाकले.

सांगण्याचे तात्पर्य एवढे की बिबट्या वाघ आणि तरस हे लोकांना दिवसा दिसत नसल्यामुळे त्यांच्यातील फरक समजत नसावा असे वाटते.

आम्हाला काम चालू असताना हे समजले की बिबटे जी जागा वापरतात तीच जागा इतर अतेक मांसभक्षी प्राणीही वापरतात. एकाच रात्री रानमांजर, तरस, आणि बिबट एकच रस्ता वापरत. याचबरोबर आमच्या कॅमेऱ्याच्या सापळ्यामध्ये रस्टी स्पॉटेड कॅट (लालसर रंगाचा व ठिपकेदारजंगली मांजरीचा एक प्रकार) सापडली. तसेच कोल्हे व खोकडही सापडले.



अनेकदा बिबट्याची पिल्ले समजून रस्टी स्पॉटेड कॅटची पिल्ले, रानमांजरी आणि तरसही लोक उचलून आणत. अशा प्राण्यांना ते वनविभाग अधिकाऱ्यांकडे घेऊन जात. पण, आम्हाला अशीही उदाहरणे मिळाली जिथे शेतकरी अश्या सापडलेल्या पिल्लांना शेताजवळ ठेवत असत. रात्री त्या पिल्लांची आई मग तो तरस, बिबट, किंवा लहान मांजरींपैकी कुणीही असेल तरी पिल्लांना घेऊन जात असेल.

## जाताजाता

आपण ह्या ज्या गोष्टी वाचल्या आहेत त्यातून एक गोष्ट नक्की की, आपल्या भागात वाघ आणि लोक वरचेवर भेटत असतात. काही वेळा ह्या भेटी खूप दुर्दैवी ठरतात तर कधी गमतीदार. पण एक नक्की आहे माणसं आणि वाघ हे दिसायला खूप वेगळे असले तरी त्यांना भेडसावणारे प्रश्न सारखेच आहेत. मग ते आपल्या मुलांची काळजी असो किंवा दोन वेळच्या जेवणाची असो. दुसरी महत्त्वाची गोष्ट ही की ह्यातले कुठलेच प्रश्न साधे सरळ नाहीत.

सुरूवातीला आपणाला वाटत असेल की अगस्ती ऋषी जेव्हा प्रवरा नदी ह्या भागात घेऊन आले तसा हा भाग सुजलाम सुफलाम झाला. ह्या प्रवरा नदीच्या पाण्यामुळे आपल्या शेतकऱ्यांना नगदी पीके घेणे शक्य झाले. ह्यातील महत्वाचे नगदी पीक आहे ऊस. आपण सगळे जाणताच की एकदा ऊस – महिन्याचा झाला की त्यामध्ये वाघच काय कोणीही लपू शकते. ह्याच नवीन मिळालेल्या आसऱ्यामुळे, जवळच मिळणाऱ्या पाण्यामुळे आणि भरपूर खाद्यामुळे इथे वाघच नाही तर बाकीचे अजून मांसाहारी प्राणीही व्यवस्थित राहू शकतात.



ही गोष्ट जशी अकोले गावाची आहे तशीच बाकीच्या अनेक गावांचीही आहे. ह्यातल्या सर्वच गोष्टी जरी अकोले गावात घडल्या असतील तरी त्या पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गावात घडू शकतात किंबहुना घडत आहेत. जोवर येथे वाघांचे अन्न मोठ्या प्रमाणात आहे तो पर्यंत येथे वाघ येतच राहणार. त्यामुळे वाघांना पकडून आपले प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी आपल्यालाच आपला परिसर स्वच्छ ठेवावा लागणार आहे. त्यामुळे भटक्या जनावरांची संख्या आटोक्यात ठेवता येईल. आपल्या शेळ्या-गुरे रात्रीच्या वेळी बंदिस्त ठेवावी लागतील. जेणेकरून आपण वाघ आणि इतर प्राण्यांच्या आणि आपल्या एकमेकांच्या मार्गात येण्याच्या घटना नक्कीच कमी होण्यास मदत होईल.

## पुस्तिकेचे शिल्पकार

ही पुस्तिका तयार करण्यासाठी अनेक लोकांचे हातभार लागले आहेत. प्रामुख्याने अकोले गावातील सर्व लोक ज्यांच्या कुतूहल, कौतुक आणि गंमतीदार स्वभावामुळे आम्हाला काम करायला खूपच मजा आली. त्याच बरोबर, वन विभाग महाराष्ट्र शासन मुख्यत: त्यांचे स्थानिक अधिकारी आणि कर्मचारी ह्यांचीही ह्या कामात खूपच मदत झाली.

ह्या पुस्तिकेला तयार करण्यासाठी लागणारी आर्थिक मदत ज्या आप्त-स्वकीयांनी न कचरता केली असे, आरुशी अत्रेय, कविता नायक, कृपाकर सेनानी, निमा मांजरेकर, रोहन किणी, सुधा गौतम, वर्षा किणी, विक्रम नायक आणि झाक शाफ्रान ह्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. ह्या पुस्तिकेतील चित्रे काढल्या बद्दल विनोद मोरे, श्रेयस देशपांडे आणि गिरीश पंजाबी ह्याचे अनेक आभार. पुस्तिकेच्या लेखन कामात मदत केल्याबद्दल ओवी थोरात, हरिश्चंद्र थोरात, गिरीश कुलकर्णी आणि अनघ पुरंदरे ह्याचेही अनेक आभार. तसेच भूषण पेंढारकर आणि प्रिया पेंढारकर ह्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण सूचनांसाठी त्यांचे अनेक आभार!

सर्वात शेवटी अकोले परिसरातील बिबटं वाघ ज्यांनी आम्हाला त्यांच्या खाजगी जीवनात डोकावू दिले आणि दाखवले कसे ते माणसाच्या सानिध्यात राहू शकतात. अशी संधी सहज कोणालाही मिळत नाही, ती आम्हाला मिळाली ह्याबद्दल आम्ही वरील सर्वांचे मनापासून आभारी अहोत.

**अशोक एकनाथ घुले** – हे अकोले तालुक्यातील एक शेतकरी आहेत. ह्या प्रोजेक्टवर काम करायला त्यांना त्यांच्या साहेबांनी थोडी जबरदस्तीच केली होती. वाघ माणसांमध्ये कसा राहातो ह्या प्रोजेक्टचे ते एक अविभाज्य घटक होते. सुरुवातीला साहेबांच्या आग्रहामुळे जरी त्यांनी कामाला थोड्या नाखुषीने सुरुवात केली तरी थोड्याच काळात त्यांनी ह्या कामात एतकी प्रगती केली की ज्यांच्या हाताखाली हे मदतनीस म्हणुन काम करत होते त्यांच्याही पेक्षा घुलेंना वाघ ह्या प्राण्या बद्दल आणि आणि त्याच्या वागणुकीबद्दल माहिती झाली. अश्याच प्रकारे काम करताना त्यांना हे कळले की वाघ हा प्राणी माणसांपेक्षा फार काही वेगळा वागत नाही. ह्या पुस्तिकेतील गोष्टीं मधून त्यांनी हेच दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

**विद्या अत्रेय** – ह्या एक वन्यजीव अभ्यासक आहेत. ज्यांनी आत्तापर्यंत फक्त जंगलातच काम केले होते आणि वन्यप्राणी हे माणसांच्या एतक्या जवळ राहू शकतात हे त्यांना माहीतच नव्हते. ह्या प्रकारचे काम त्यांच्यासाठी नविनच होते आणि एका अर्थी डोळे उघडणारे ठरले. ग्रामीण भारत आणि शहरी भारत ह्यातील त्यांना दिसलेला फरक त्यांना खूप काही शिकवून गेला. ह्यातील महत्वाचा जो फरक होता तो होता ग्रामीण भागातील लोकांचा वन्यप्राण्यांसाठी असलेला समजुतदारपणा. अकोल्यातील हे काम आपल्याला बाहेरच्या जगाला हे दाखवून देण्यास मदत करणार आहे की कसे इथली महान माणसं अजूनही वाघासारख्या वन्यप्राण्यालाही समजून घेतात ते!



**हे चित्र वाघोबाच्या देवळाचे आहे**

महाराष्ट्रातील अनेक गावात अशा प्रकारे वाघाची पूजा केली जाते

www.projectwaghoba.in